# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २२२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २८/०४/२०१८

**१) सोन्या चांदीचे दागीणे व नगदी पैश्याची चोरी ;–**

दिनांक २६/०४/२०१८ चे २३.०० वाजता ते दिनांक २७/०४/२०१८ चे ११.३० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी विवेक सहादेव पारधी वय ४३ वर्ष, रा. आनंद नगर तकीया वार्ड भंडारा याचा भाऊ राजु सहादेव पारधी हे एकाच घरात खालच्या व वरच्या माळयावर वेगवेगळे राहत असुन फिर्यादी व फिर्यादीचा भाऊ हे कुटुंबासह लग्न कार्यक्रमा करीता बाहेरगावी गेले असता फिर्यादी हे दिनांक २६/०४/२०१८ ला २२.३० वा परत येवुन आपले घरी वरच्या माळयावर झोपी गेले असता, त्यावेळी कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन फिर्यादीचे भावाच्या घराचा समोरील दाराचा ताला तोडून आत प्रवेश करुन बेडरुमध्ये असलेले २ लोखंडी आलमारीचे कुलुप तोडुन १००/–रु.च्या १५० नोटा एकुण १५,०००/–रु. व ५,००/–रु.,२० नोटा एकुण १०,०००/–रु. सोन्याचा नाकातील खडा किंमती ५,००/–रु. चांदीच्या पायपट्टया ३ तोळे किंमती २५००/–रु. कानातील सोन्याचे टॉप्स ३ ग्रॅम किंमती ५,०००/–रु. व नगदी २५००/–रु. असा एकुण ३५,५००/–रु. चा माल चोरुन नेल्याने, फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ४५४,४५७,३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चेके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**२) संगनमत करुन अवैधरित्या बिना पास परवाना रेतीची चोरी करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २७/०४/२०१८ चे २०.४५ वाजता दरम्यान यातील दोन्ही ट्रक आरोपी चालकाने आप आपले ताब्यातील ट्रक मध्ये प्रत्येकी ३ –३ ब्रास रेती एकुण ६ ब्रास रेती किंमती ४०,०००/–रु. ची रेती बिना पास परवाना अवैधरित्या चोरुन वाहतुक करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोहवा. दिक्षीत यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९,१०९,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. लांजेवार पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) संगनमत करुन मुलीस अश्लिल शब्दात बोलुन तिची छेळ काढुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २५/०४/२०१८ चे १५.३० वाजता. दरम्यान यातील मृतक हिला आरोपी क्र. १ ने आंघोळ करतांनी पाहीले व त्यानंतर अश्लिल शब्दात बोलुन तुझा मर्डर करतो, असे बोलुन अपमानीत केले तसेच आरोपी क्र. २ ने लायब्ररी मध्ये वाईट शब्दात बोलुन तिची छेळ काढली होती व दोन्ही आरोपीतांनी अधुन मधुन मृतकला त्रास देवुन तीला आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याने दोन्ही आरोपीच्या त्रासाला कंटाळुन मृतकने दिनांक २५/०४/२०१८ ला स्वत:चे राहते घरी बाथरुम मध्ये स्वत:च्या अंगावर रॉकेल टाकुन जाळुन घेतले व औषधोपचारा दरम्यान सामान्य रुग्नालय भंडारा येथे दिनांक २६/०४/२०१८ ला मरण पावल्याने पो. स्टे. भंडारा येथे मर्ग क्र. ००/१८ क. १७४ जाफौ चे १२/१८ क. १७४ जाफौ चे तपासा वरुन सरतर्फे फिर्यादी पोउपनि. रेवतकर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३०६,३४ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. वर्मा पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**४) १२ चक्का ट्रक चालकांच्या लापरवाहीने चारचाकी वाहनाला धडक देवुन नुकसान केल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २७/०४/२०१८ चे ०९.३० यातील फिर्यादी भगवान देवराम बावनकर वय ४६ वर्ष, रा. संत कबीर वार्ड भंडारा हा त्याचे आय २० होंन्डाई गाडी क्र.एम. एच. ३६/एच ३२०० ने भंडारा कडे येत असता मागेहुन येणाऱ्या १२ चक्का ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील ट्रक लापरवाहीने चालवित फिर्यादीच्या आय २० गाडीला उजव्या बाजुने घासत घेवुन गेल्यामुळे गाडीचे उजव्या बाजुचे समोरचे टायर फुटले व उजव्या बाजुचा मिटर तुटुन व उजव्या बाजुचे गाडीचे एकुण अंदाजे २५,००० ते ३०,०००/–रु. चे नुकसान केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९ भांदवि. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**५) मोटार सायकवरुन नियत्रंण सुटुन झाडाला धडक लागुन स्वत:चे मरणास व सोबतचे इसमांनास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक २७/०४/२०१८ चे यातील आरोपी चालकाने त्याचे मोटार सायकल वर ०३ सिट बसवुन लग्न कार्यक्रम आटोपुन मोहाडी वरुन चिचोली गावाकडे भरधाव वेगाने व हयगयीने व निष्काळजीपणे मोटार सायकल येत असतांनी त्याचा मोटार सायकल वरुन नियत्रंण सुटल्याने डोंगरगाव बसस्थानक टर्निग वर झाडला धडक मारुन स्वत:चे मरणास व १) हेंमत अरविंद बाहे वय २७ वर्ष २) नितेश आसाराम बाहे वय २७ वर्ष, दोन्ही रा. चिचोली यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी देवचंद हुकुमचंद माने वय ३४ वर्ष, रा. चिचोली यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २७९,३३७,३०४(अ) भांदवि. सहकलम १२८(ए)/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन आंधळगाव हे करीत आहेत.

**६) औषधोपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :–**

दिंनाक ३१/०३/२०१८ चे १९.४६ वाजता दरम्यान यातील मृतक संतोष फत्तुजी राखडे वय ३० वर्ष, रा. जिल्हा कारागृह भंडारा हा जिल्हा कारागृह भंडारा येथे असुन अचानक दिनांक ३१/०३/२०१८ चे १९.४६ वाजता. दरम्यान कारागृहात प्रकृती खराब झाल्याने त्यास औषधोपचारा करीता सामान्य रुग्नालय भंडारा येथे प्रथमोउपचारा करीता भरती केले असता तेथील डॉ. ने रेफर केल्याने त्यास मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान दिनांक २१/०४/२०१८ चे १५.३८ वा. मरण पावल्याने पो. स्टे अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१८ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र टपालाने प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. टेभुर्णे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. आतराम पोलीस स्टेशन भंडारा करीत आहेत.

**७) संर्पव्दंश केल्याने इसमाचा मृत्यु :–**

दिंनाक २६/०४/२०१८ चे ०७.३० वाजता दरम्यान यातील मृतक चोकाराम तुकाराम बोरकर वय ४८ वर्ष, रा. जाम हा शेतात काम करीत असतांनी मृतकचे उजवे हाताचे अंगठयाला सापाने चावा घेतल्याने मरण पावला आहे. असे, फिर्यादी अनिकेत उपासराव बोरकर वय २३ वर्ष, रा. जाम यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोनि. गुरनुले पोलीस स्टेशन आंधळगाव करीत आहेत.

**८) औषधोपचारा दरम्यान तरुणीचा मृत्यु :–**

दिंनाक २६/०४/२०१८ चे ०७.३० वाजता दरम्यान यातील मृतक रश्मि महेन्द्र साखरे वय २४ वर्ष, रा. साकोली हि दिनांक २५/०४/२०१८ ला १९.०० वाजता दरम्यान घरच्या बाथरुम मध्ये स्वत:चे अंगावर रॉकेल टाकुन जळाल्याने तिला प्रथम उपचारा करीता ग्रा.रु. साकोली येथे भरती केले असता तेथील डॉक्टरने तपासुन रेफर केल्याने तिला सामान्य रुग्नालय भंडारा येथे औषधोपचारा करीता भरती कले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने डॉ. मेमो यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. रेवतकर पोलीस स्टेशन साकोली करीत आहेत.

**९) विहीरीचे पाण्यात बुडुन महिलेचा मृत्यु :–**

दिंनाक २७/०४/२०१८ चे ०७.४५ वाजता दरम्यान यातील मृतक सौ. शोभा किशोर मोरे वय ६२ वर्ष, रा. सिंधपुरी ही मनोरुग्न असुन तिचा उपचार मानसिक रोग तज्ञाकडे नागपुर येथे सुरु होता. यातील मृतक ही औषध आणन्याकरीता नागपुर येथे जाते म्हणुन घरुन निघुन गेली ती घरी परत आली नाही. दिंनाक २७/०४/२०१८ चे ०७.४५ वाजता सुमारास ती रोहा शेत शिवारातील विहीरीत बुडुन मृत अवस्थेत आढळल्याने फिर्यादी विनोद बिरबल मोरे वय ४५ वर्ष, रा. सिंधपुरी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पोलीस स्टेशन मोहाडी करीत आहेत.

**१०) उपचारा दरम्यान इसमाचा मृत्यु :–**

दिंनाक २७/०४/२०१८ चे १७.०० वाजता दरम्यान यातील मृतक सोना विठोबा मेश्राम वय ५५ वर्ष, रा. लाखांदुर हा आपले गावाकडे जात असतांना अपघात झाल्याने त्यास ग्रामीण रुग्नालय लाखांदुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पोना. मुंजुमकर यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. ऊईके पोलीस स्टेशन लाखांदुर करीत आहेत.

**११) अवैध दारु /जुगार अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक २७/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन मोहाडी, वरठी, तुमसर, सिहोरा, साकोली, दिघोरी, भंडारा, आंधळगाव व पालांदुर येथे अवैध हातभट्टी +देशी दारू/जुगार अडड्यावर धाडी घालुन एकुण १२ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ९८ लिटर हातभंट्टी दारू + ३४९५ किलो सडवा + साहीत्य किंमती १,७६,४२०/–रु. व २ लिटर ९७० मिली लिटर देशी दारु + मोटार सायकल किंमती २५८५६/रु. तसेच जुगारातुन १२५५/रु. असा एकुण किंमती २,०३,५३१/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**१२) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २७/०४/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १३२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी वाहतुक– १० तीन सिटर वाहनाकरीता– ५ ईतर वाहनांवरती – ११७ केसेस करण्यात आले आहे.


**(मपोउपनि.प्रणती लांजेवार)**
**माहिति कक्ष भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२**


**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.